दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ मंगळवार, ०३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : २९७ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353



## हरित महाराष्ट्रसाठी 300 कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा – मुख्यमंत्री

**मुंबई :** पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण-३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा.स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.

मराठवाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

■ वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा
■ रोप निर्मितीसाठी खासगी नर्सरी व बचतगटांचा सहभाग घ्यावा

मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) चे संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.

## कल्याणमधील ठाकरे गटाच्या बेपत्ता नगरसेवकांमधील मधुर म्हात्रे पोहचले घरी - समर्थकांनी वाजतगाजत केले स्वागत

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेची निवडणूक पार पडल्यानंतर विजयी झाल्याचे समजताच उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रभाग क्रमांक १३ ड मधील नवनिर्वाचित नगरसेवक मधुर म्हात्रे यांनी शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक महेश पाटील यांच्या उपस्थितीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची तात्काळ भेट घेतली होती. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. ही सदिच्छा भेट असल्याचे सुरूवातीला सांगण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून प्रभाग क्रमांक १३ अ मधील ठाकरे गटाच्या नगरसेविका ॲड. कीर्ति राजन ढोणे आणि मधुर म्हात्रे आपले मोबाईल बंद करून बेपत्ता असल्याचे उघड झाले होते. सोळा दिवसानंतर मधुर म्हात्रे कल्याणमधील आपल्या घरी परतले.



मधुर म्हात्रे यांनी आपण ठाकरे गटातच राहणार की शिवसेना शिंदे गटाला सभागृहात पाठिंबा देणार याविषयी अद्याप भूमिका स्पष्ट केलेली नाही. ॲड. ढोणे, मधुर म्हात्रे यांच्यानंतर पाठोपाठ ठाकरे गटाचे स्वप्नाली केणे, राहुल कोट हे नगरसेवक बेपत्ता झाले. शिवसेना शिंदे गटाच्या शिलेदारांनी त्यांना आपल्या रखवालीत ठेवल्याची माहिती मिळाल्यावर ठाकरे गटाच्या कल्याण, डोंबिवलीतील पदाधिकाऱ्यांनी त्यांचा मुरबाड, कर्जत, नाशिक, शहापूर, भिवंडी परिसरात शोध घेतला. ते कोठेही आढळले नाहीत.ठाकरे गटाच्या निवडून आलेल्या नऊ नगरसेवकांपैकी पाच नगरसेवकांच्या गटाची नोंदणी कोकणभवन येथे करण्यात आली आहे. गेल्या सोळा दिवसांपासून ठाकरे गटाच्या पक्ष नेते, पदाधिकाऱ्यांच्या संपर्कात न राहिल्याने ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष शरद पाटील, शहरप्रमुख बाळा परब यांनी या बेपत्ता नगरसेवकांच्या घरी आवश्यक त्या नोटिसा देऊन त्यांना पक्ष पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे कळविले आहे. त्यांच्या घराला नोटिसा लावण्यात आल्या आहेत. मधुर म्हात्रे यांचे वडील उमेश म्हात्रे यांनी मधुर हे देवदर्शनासाठी गेले आहेत. ते लवकरच घरी येतील असे माध्यमांना सांगितले होते.

उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नावाने आणि चिन्हावर निवडून येऊन नंतर पक्ष आणि मतदारांशी प्रतारणा करून हे चारही नगरसेवक बेपत्ता झाल्याने ठाकरे गटाच्या कल्याणमधील पदाधिकारी आणि नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

## अजित पवारांचा अस्थी कलश पाहून आनंद परांजपे यांच्यासह कार्यकर्त्यांचा अश्रूंचा बांध फुटला

**ठाणे :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान अपघातात निधन झाले असून या घटनेमुळे राज्यभर शोककळा पसरली आहे. सोमवारी अजित पवार यांचा अस्थी कलश ठाणे पक्ष कार्यालयात आणण्यात आला. हा कलश पाहून माजी खासदार आनंद परांजपे यांच्यासह कार्यकर्त्यांचा अश्रूंचा बांध फुटला.राज्यामध्ये पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी रणधुमाळी सुरू आहे. या निवडणूक प्रचारसाठी अजित पवार हे बुधवारी सकाळी बारामतीला विमानाने निघाले. बारामतीमध्ये विमान लॉंडिंग होत असतानाच, विमानामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने विमान अपघात झाला. या अजित पवार, विदीप जाधव (खासगी सुरक्षारक्षक), सुमित कपूर (पायलट कॅप्टन), संभवी पाठक (कॅप्टन) आणि पिंकी माळी



(फ्लाईट अटेंडंट) यांचा मृत्यू झाला.अजित पवार यांच्या विमान अपघातात निधन झाल्यानंतर राज्यभर शोककळा पसरली आहे. त्यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक तसेच सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या जाण्याने राज्यातील नेतृत्वाचा एक भक्कम आधार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाच्या बातमीने कार्यकर्ते तसेच समर्थकांमध्ये मोठे दुःख व्यक्त केले जात असून अनेक ठिकाणी श्रद्धांजली सभांचे आयोजन करण्यात येत आहे.

अजित पवार यांचे अस्थी कलश सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ठाणे शहर (जिल्हा) मध्यवर्ती कार्यालयात आणण्यात आला. माजी खासदार आनंद परांजपे हे अजित पवार यांचा अस्थी कलश घेऊन आले. त्यावेळी भावूक होऊन त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी पक्षाचे नेते प्रमोद हिंदुराव, भाजप आमदार निरंजन डावखरे तसेच इतर जिल्हा पातळीवरील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.परांजपे यांच्या हातातील अजित पवार यांचा अस्थिकलश पाहून कार्यकर्त्यांचा अश्रूचा बांध फुटला. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी उपस्थित राहून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ठाणे शहर (जिल्हा) परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## ठाण्याच्या महापौर लागल्या कामाला; केलं हे पहिलं काम

**ठाणे :** नुकतीच ठाणे महापालिका महापौर पदी शर्मिला पिंपळोलकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यानुसार, त्यांनी कामाला सुरुवात केली आहे. महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी ठाणे महापालिकेत बैठक पार पडली. या बैठकीत सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठाणे महापालिका महापौर पदासाठी अनुसूचित जातीचे आरक्षण जाहीर झाल्यामुळे शिंदे सेनेतील आठ नगरसेवकांच्या नावाची चर्चा होती. शिंदेच्या शिवसेनेकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील तब्बल सात नगरसेवक निवडून आले आहेत. यामध्ये प्रभाग ३ (अ) मधील पद्मा भगत, ६ (अ) मधील वनिता घोगरे, ७ (अ) मधील विमल भोईर, ९ (अ) मधील गणेश कांबळे, १६ (अ) मधील डॉ. दर्शना जानकर, २४ (अ)मधील आरती गायकवाड आणि २८ (अ)मधील दीपक जाधव यांचा



समावेश होता. या सात जणांसह कोपरी येथील सर्वसाधारण प्रभागातून निवडणूक लढवलेल्या शर्मिला पिंपोळकर यांचेही नाव चर्चेत होते. यापैकी शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर पक्षाने अखेर शिक्कामोर्तब केला.

३ फेब्रुवारी ला जरी महापौर पदासाठी निवडणूक होणार असली तरी शर्मिला पिंपोळकर यांच्या विरोधात अर्ज दाखल झालेले नसून त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. ३ तारखेला फक्त अधिकृत निवडीची औपचारिकता शिल्लक राहिली आहे.परंतु, ३ तारखे आधीच शर्मिला पिंपोळकर यांनी कामाला सुरुवात केल्याची दिसत आहे. रविवारी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महापालिकेत सर्वंकष स्वच्छता मोहिमेसंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, नगरसेवक भरत चव्हाण हे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आज, सोमवार रोजी सकाळी ७.०० वाजताच्या सुमारास नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

कोपरीतील अष्टविनायक चौक येथून या सर्वंकष या स्वच्छता मोहिमेस सुरुवात झाली.

कोपरी गाव, कन्हैया नगर सिद्धार्थ नगर, बारा बंगला डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत रस्ते व परिसराची साफसफाई, कचरा संकलन, रस्ते पाण्याने धुणे त्याचबरोबर सार्वजनिक शौचालयांची साफसफाई व निर्जंतुकीकरण करण्यात आले. याशिवाय या मोहिमेदरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण देखील केले. या स्वच्छता मोहिमेत महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## पालघरमध्ये 'डुरियन' फर्निचर कंपनीला भीषण आग, कंपनी जळून खाक

**पालघर :** पालघर येथील सिडको औद्योगिक वसाहत चिंटूपाडा परिसरात असलेल्या प्रसिद्ध 'डुरियन' फर्निचर कंपनीला आज दुपारी भीषण आग लागली. या आगीत कंपनीमधील फर्निचर आणि कच्चा माल जळून खाक झाला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

काल दुपारी एक वाजताच्या सुमारास कंपनीच्या उत्पादन विभागातून धूर निघू लागला. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. ही वेळ कामगारांच्या दुपारच्या जेवणाची असल्याने बहुतांश कामगार कंपनीबाहेर होते, ज्यामुळे मोठी जीवितहानी टळली. आगीचे वृत्त समजताच आजूबाजूच्या कंपन्यांमधील कामगारांनाही तातडीने सुरक्षितस्थळी हलवण्यात आले.डुरियन कंपनीच्या शेजारीच आदिवासी विकास विभागाचे शासकीय मुलांचे वसतिगृह आहे. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट पाहता प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना तातडीने इमारतीबाहेर काढले. या तत्परतेमुळे विद्यार्थी सुरक्षित असून मोठा अनर्थ टळला आहे.



### जम्बो सेलचे नुकसान टळले

दरवर्षीप्रमाणे १ ते १६ फेब्रुवारी दरम्यान कंपनी कडून फर्निचर विक्रीचा 'जम्बो सेल' आयोजित करण्यात आला होता. सुदैवाने, हा सेल ज्या ठिकाणी लावला होता, ते ठिकाण मुख्य उत्पादन केंद्रापासून काही अंतरावर असल्याने त्या भागातील साहित्याचे नुकसान टळले आहे. मात्र, उत्पादन युनिटमधील यंत्रसामग्री आणि तयार फर्निचर पूर्णपणे जळून कोळसा झाले आहे.

### शॉर्टसर्किटचा अंदाज

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीत जीवितहानी झाली नसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## संपादकीय

### वाढीचे आकडे आणि वास्तव यातील दरी

देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचे दावे सातत्याने केले जात आहेत. GDP वाढ, जागतिक क्रमवारीत सुधारणा आणि गुंतवणुकीच्या घोषणांमधून विकासाची चमकदार मांडणी होते. मात्र या आकड्यांच्या झगमगाटामागे सामान्य नागरिकाच्या आयुष्यात आर्थिक सुरक्षितता, स्थैर्य आणि प्रगती जाणवते का, हा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. वाढ जर लोकांच्या दैनंदिन अनुभवाशी जुळत नसेल, तर त्या वाढीचा अर्थ काय, आणि ती नेमकी कोणासाठी आहे, हा मूलभूत मुद्दा आज देशासमोर उभा आहे. सध्याच्या परिस्थितीकडे पाहिले तर विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचण्याऐवजी असमानता, बेरोजगारी आणि असुरक्षितता वाढत असल्याचे स्पष्ट दिसते.

**विषमतेचा विक्रमी उंचावलेला आलेख**

भारतामध्ये उत्पन्न आणि संपत्तीतील तफावत आता ऐतिहासिक पातळीवर पोहोचली आहे. देशाच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा वरच्या थरातील लोकांकडे केंद्रित झाला असून, खालच्या अर्ध्या लोकसंख्येच्या वाट्याला अत्यल्प हिस्सा उरतो. संपत्तीचे केंद्रीकरण अधिक चिंताजनक आहे—मोजक्यांच्या हातात देशाच्या एकूण संपत्तीचा मोठा भाग साचत आहे. ही केवळ आकडेवारी नसून आर्थिक रचनेतील गंभीर असंतुलनाचे द्योतक आहे. संपत्ती काहींच्याच तिजोरीत अडकली की बाजारातील मागणी घटते, वाढ कृत्रिम ठरते आणि अर्थव्यवस्था आतून दुर्बल होते.

**मध्यमवर्गावर वाढता आर्थिक ताण**

या विषमतेचा सर्वाधिक फटका मध्यमवर्गाला बसत आहे. पगारवाढीचा वेग मंदावलेला असताना महागाई आणि जीवनावश्यक खर्च वेगाने वाढले आहेत. घरगुती बचत घटून ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांसाठी कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. कर्जावर चालणारी अर्थव्यवस्था वरून मजबूत वाटू शकते, पण तिची मुळे कमकुवत असतात. मध्यमवर्ग आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाला की उपभोगशक्ती कमी होते आणि विकासाचा वेग आपोआप मंदावतो.

**रोजगारवाढीऐवजी बेरोजगारीचे सावट**

GDP वाढीच्या दाव्यांमागे रोजगारनिर्मितीचे अपयश दडलेले आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रे पुरेसे रोजगार देण्यात अपयशी ठरत आहेत. अनेकांना पुन्हा शेतीकडे वळावे लागत आहे; मात्र तेथे उत्पन्न कमी आणि अस्थिरता अधिक आहे. सुरक्षित, स्थिर आणि सामाजिक संरक्षण असलेल्या नोकऱ्या झपाट्याने कमी होत असून, मोठा कामगारवर्ग असंघटित क्षेत्रात ढकलला जात आहे. लेखी करारांचा अभाव, सामाजिक सुरक्षेची कमतरता आणि अनिश्चित उत्पन्न ही आजची कटू वास्तवता आहे.

सुशिक्षित तरुणांची स्थिती अधिक गंभीर आहे. नोकऱ्यांच्या अभावामुळे अनेकांनी रोजगार शोधण्याची आशाच सोडली आहे. लोकसंख्यात्मक लाभांश ही भारताची मोठी ताकद मानली जात होती; पण रोजगाराविना तरुणाई ही सामाजिक अस्थिरतेची ठिणगी ठरू शकते. अपेक्षाभंग झालेली तरुण पिढी आर्थिक प्रश्नांना सामाजिक आणि राजकीय संकटात रूपांतरित करू शकते.

**नफा वाढला, श्रमाचे मोल घटले**

या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट नफ्यातील झपाट्याने झालेली वाढ ठळकपणे जाणवते. कंपन्यांचे उत्पन्न वाढले, मात्र रोजगारनिर्मिती आणि वेतनवाढ त्याच प्रमाणात झाली नाही. आर्थिक धोरणांचा कल भांडवलाकडे अधिक आणि श्रमांकडे कमी राहिला. कररचनेतही हे स्पष्ट दिसते—कॉर्पोरेट करात कपात झाली, पण अप्रत्यक्ष करांचा भार सामान्य नागरिकांवर वाढला. वैयक्तिक आयकरातून मिळणारे उत्पन्न कॉर्पोरेट करांपेक्षा जास्त होणे ही कररचनेतील गंभीर विसंगती दर्शवते.

**कल्याणकारी खर्चाला कात्री**

ग्रामीण रोजगार हमी, सामाजिक सुरक्षा आणि पेन्शन योजनांवरील खर्चात कपात होत आहे. आर्थिक अडचणीच्या काळात सरकारने सुरक्षाजाळे मजबूत करणे अपेक्षित असते.

## रिसोड येथे संत रविदास महाराज जयंती साजरी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** रिसोड -1 फेब्रुवारी दिनांक एक फेब्रुवारी 2026 रोजी चर्मकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती रिसोड शहरात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. रिसोडच्या चर्मकार विकास प्रबोधिनीने पुढाकार घेत संत रविदास महाराज जयंती समारंभाचे आयोजन, संत सातारकर महाराज संस्थान रिसोड येथे केले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री अर्जुन खिराडे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून रिसोड शहराचे नगराध्यक्ष श्री भगवान दादा क्षीरसागर, पीएसआय श्री गोखले साहेब, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष श्री गजानन खंदारे मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कव्हर तसेच श्री

व शांतता कमिटीचे अध्यक्ष समाजसेवक श्री मंचकराव जाधव, संत सातारकर महाराज संस्थानचे अध्यक्ष दत्तराव देशमुख,रिसोड नगर परिषद उपाध्यक्ष श्री विष्णू भाऊ कदम, नगरसेवक श्री संतोषराव च-हाटे, श्री संजय बगडिया उपस्थित होते. विचार मंचावर चर्मकार समाजातील काही ज्येष्ठ मंडळी उपस्थित होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

प्रास्ताविका मधून श्री दिनकर कानडे यांनी, चर्मकार समाजाने सांप्रत काळानुसार अपडेट होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.नंतर समाजातील



बालवक्त्यांनी संत रविदास महाराज यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली. मुख्याध्यापक श्री राधाकिसन झुंजारे सर यांनी, मान्यवरांना रिसोडचे चर्मकार बांधव गेल्या आठ वर्षापासून समाज मंदिरासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

संभाजी ब्रिगेडचे श्री गजानन खंदारे यांनी आपल्या मनोगतात,महाराष्ट्राच्या महान संत परंपरेची माहिती सर्वांना दिली. तालुकाध्यक्ष श्री शिवाजी कव्हर सर यांनी, आपण थोर महान संतांना, नेत्यांना जातीच्या चौकटीत बंद केले, याबद्दल विचार होऊन परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. असे महत्त्वाचे आवाहन केले.रिसोड शहराचे नगराध्यक्ष श्री भगवानदादा क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात, संत रविदास महाराजांची जयंती अतिशय शांतपणे व नियोजनबद्ध व वैचारिक पद्धतीने साजरी केल्याबद्दल चर्मकार समाजाचे कौतुक केले तसेच चर्मकार



समाजाच्या रिसोड येथे रविदास भवनाच्या मागणीचा विषय मार्गी लावू, असे आश्वासन दिले. पीएसआय श्री गोखले साहेब यांनी, समाजातील बाल वक्त्यांना व्यासपीठावर बोलण्याची संधी देऊन त्यांच्यात सभाधिटपणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.याप्रसंगी चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि सेवानिवृत्त समाज बांधवांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमस्थळी समाजातील महिलांनी सुंदर रांगोळीची आरास केली.कार्यक्रमाचे बहारदार संचलन सचिव श्री शंकर गायकवाड सर यांनी केले. तर आभार प्रा. पानझाडे सर यांनी मानले.कार्यक्रमासाठी रिसोड मधील सर्व चर्मकार समाज बांधव आणि भगिनी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चर्मकार विकास प्रबोधिनीचे अध्यक्ष श्री पांडुरंग घायाळ, एकनाथ खिराडे, रमेश खिराडे, विजय झुंजारे,गणेश घायाळ,आत्माराम निळे, प्रदीप खिराडे सर,पंढरी राजगुरू, संतोष वानरे सर, प्रमोद कानडे विजय राजगुरू आणि रिसोड मधील सर्व समाज बांधवाचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मराठी व इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतले उद्योगाचे धडे

महाराष्ट्र जीत

**प्रदीप पोटफोडे/विहामांडवा** – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता प्रत्यक्ष उद्योगक्षेत्राचा अनुभव मिळावा, या उद्देशाने येथील आर.वाय.पी. कला महाविद्यालयाच्या मराठी व इतिहास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गुळनिर्मिती उद्योगाची प्रत्यक्ष पाहणी करून उद्योगाचे धडे घेतले.

महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय शिंदे व इतिहास विभागप्रमुख प्रा. दत्ता साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी नवगाव (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील प्रसिद्ध गुळमेश्वर कारखान्याला शैक्षणिक भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी ऊसापासून गुळ पावडर तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया, त्यामागील तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि उद्योग व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

आर.वाय.पी. कला महाविद्यालयात "चला उद्योगाला साथ देऊ आणि राष्ट्रोन्नतीचे साक्षीदार होऊ" हा उपक्रम मागील चार वर्षांपासून सातत्याने राबविला जात असून, विविध औद्योगिक स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण दिले जाते. गुळमेश्वर कारखाना गुळ पावडर निर्मितीसाठी राज्यातच नव्हे तर देश-विदेशात प्रसिद्ध असून येथील उत्पादनाची निर्यातही केली जाते.

या वेळी साहाय्यक तंत्रज्ञ तांदळे साहेब यांनी ऊसाच्या रसावर विविध प्रक्रिया करून गुळ पावडर कशी तयार केली जाते, निर्मिती प्रक्रियेतून उरणाऱ्या गाळाचा विटा तयार करण्यासाठी कसा वापर केला जातो, मळीचा पुनर्वापर, तसेच वीज निर्मितीसाठी



वापरली जाणारी उपकरणे याबाबत सविस्तर माहिती दिली. बचत गटाच्या माध्यमातून या कारखान्याची उभारणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना विविध यंत्रसामग्रीचे कार्य प्रत्यक्ष दाखवून समजावून सांगण्यात आले.

या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर गीरे यांचे विशेष प्रोत्साहन लाभत असून त्यामुळे विद्यार्थ्यांना नव्या कौशल्यांचे शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे.

या शैक्षणिक भेटीत कु. पूजा डिक्कर, श्वेता गंगथीरे, मानसी जयस्वाल, प्राची बनसोडे, भाग्यश्री शिंदे, जिजाबाई शिंदे, वैष्णवी काळे, अश्विनी नाचण, अंजली तांबे, महेश नरके, भाऊसाहेब दुबाले आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रा. डॉ. संजय शिंदे व प्रा. दत्ता साबळे यांनी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने अशा उपक्रमांत सहभागी होऊन उद्योग व कौशल्यपूर्ण शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उद्योगभेटी हे प्रेरणादायी पाऊल ठरत असून, शिक्षणासोबत रोजगारक्षमतेचे धडे देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नमस्ते नाशिक फाउंडेशन सौभाग्याचे लेणी हळदी कुंकाचा कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** "हळदी कुंकू, व सन्मान नारी शक्तीचा "ज्ञानातून उजळे तलवारीची पात चला दाखवूया महिलांना शिक्षणाची वाट " मुलींना समजू नका भार त्याच तर आहे खऱ्या जीवनाचा आधार ही संकल्पना मनात ठेवून या संकल्पनेतून महिलांना केवळ भार न समजता, खऱ्या अर्थाने जीवनाचा आधार मानत त्यांच्या सन्मानासाठी व सक्षमीकरणासाठी फाउंडेशन तर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव यांच्या पुढाकाराने ग्रामीण भागातील महिलांना शिक्षणाचे महत्त्व, तसेच शिक्षणातून उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी यांची माहिती देण्यासाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने कुशेगाव, तालुका इगतपुरी येथे आयोजित "सौभाग्याचे लेणी" हा हळदीकुंकू समारंभ अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला परिसरातील जवळपास २०० हून अधिक महिलांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अरुण शिनकर (निवृत्त डेअरी मॅनेजर, डेअरी डेव्हलपमेंट



डिपार्टमेंट) व मुरलीधर सरनाईक (वीज निर्मिती, विद्युत मंडळ) यांच्या हस्ते गावातील होतकरू महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये वंदना सोनवणे, विमलबाई प्रभाकर सोनवणे, अंबाबाई मेंगाळ, दीक्षा सोनवणे, लिलाबाई सोनवणे व चिऊबाई आगविले यांचा समावेश होता. तसेच ग्रामपंचायत सदस्य वंदना सोनवणे व चिऊबाई आगविले यांचा बक्षीस देऊन विशेष सत्कार करण्यात आला. नमस्ते नासिक फाउंडेशनचे अध्यक्ष स्नेहल देव यांच्यातर्फे कुशेगाव येथील तरुण मनोज सोनवणे यांची सीआरपीएफ मध्ये निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला, यानंतर नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव यांनी महिलांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व, शिक्षणातून मिळणारे रोजगार व त्याचे दीर्घकालीन फायदे याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी महिलांसाठी हास्ययोगाचे प्रात्यक्षिक घेतले व सांगितले की, दररोज किमान ४५ मिनिटे व्यायाम केल्यास शरीर निरोगी राहते आणि मन सदैव आनंदी राहते. स्नेहल देव फ्रेंड सर्कलच्या सीमा सरनाईक, कविता राणे, मंजिरी घन, गायत्री पारिख, सोनाली देव, लता शिनकर, ज्योती अमृतकर अलका देव प्रतिभा बनाईत आदी महिलांच्या हस्ते गावातील सर्व महिलांना हळदीकुंकूचे वाण देण्यात आले. कार्यक्रमास शंकरजी सोनवणे पोलीस पाटील एकनाथ कातोरे सरपंच देविदास सोनवणे, आदी मान्यवर उपस्थित होते. अमेरिका स्थित सॉफ्टवेअर तज्ञ स्वप्निल शिनकर व अभियंता किशोर सरनाईक यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष स्नेहल देव यांनी महिलांना व मुलींना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत, "आपण स्वतः शिकू आणि भावी पिढीलाही शिकवू" असा संकल्प सर्व महिलांकडून करून घेतला.

## वाशीम मध्ये सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना केले अभिवादन

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रतिनिधी) :** स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि.२ फेब्रुवारी रोजी दुपारी ५:३० वाजता पितामह सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या ११३ व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी सुरूवातीला पितामह सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.अभिवादन कार्यक्रमाला बुद्ध फुले शाहू आंबेडकर विचारांचे शाहीर धम्मानंद इंगोले,डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, डायमंड कोचींग क्लासेस चे संचालक माधव डोंगरदिवे, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर,से.नि.माध्य.शिक्षक आर.पी.कांबळे, अशोक देशमुख, दादाराव इंगोले, उद्धव अवचार,अर्यन बरडे, राहूल सोमटकर,सागर अवचार,अजय अवचार




यांचेसह अनेकांनी सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना अभिवादन केले.नंतर शाहीर धम्मानंद इंगोले यांनी आपल्या गाण्याच्या माध्यमातून राहील्या आठवणी, आता ते येणार ना परतूनी ,या गाण्यातून सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना अभिवादन केले.यावेळी माधव डोंगरदिवे, राजकुमार पडघान,व प्रविण पट्टेबहादूर, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांनी सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माधव डोंगरदिवे यांनी केले तर आभार प्रदर्शन समाधान अवचार यांनी केले.

## भव्य काव्य संमेलन व सन्मान सोहळ्यात प्रवीण बागडे यांचा सन्मान

महाराष्ट्र जीत

**नागपूर :** कविता ही केवळ भावनांची अभिव्यक्ती नसून समाजाचे आरसेपण जपणारे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. याच विचारातून कविता म्हणजे प्रबोधन या संकल्पनेतून संगमनेर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महोत्सव कवितांचा' या भव्य काव्य संमेलन व सन्मान सोहळ्यात नागपूर येथील साहित्यिक-कवी प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा सन्मान करण्यात आला. हा साहित्यिक व सांस्कृतिक सोहळा रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री कचेश्वर देवस्थान मंदिर, बोटा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला. या महोत्सवासाठी संगमनेर, राहुरी, पारनेर, जुन्नर, नागपूर आणि अकोला या विविध तालुक्यांमधून निवडक साहित्यिक, कवी, विचारवंत आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.



संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून आधुनिक गाडगेबाबा म्हणून ओळखले जाणारे डॉ. हरिभाऊ उगले उपस्थित होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून कृषी उपसंचालक श्री प्रविण गवांदे यांनी कार्यक्रमाची धुरा सांभाळली. काव्यसंमेलनात प्रवीण बागडे यांनी सामाजिक वास्तवावर भाष्य करणाऱ्या आशयपूर्ण व संवेदनशील 'असत्य कथा' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना पुष्प, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सामाजिक प्रश्नांवरील परखड मांडणी, प्रखर शब्दशैली आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन यामुळे त्यांच्या कविता वाचक-श्रोत्यांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरत आहेत. त्यांच्या सशक्त सहभागामुळे 'महोत्सव कवितांचा' या साहित्यिक उपक्रमाची उंची अधिक वाढली असून साहित्यप्रेमी व रसिकांकडून त्यांच्या कार्याचे स्वागत आणि कौतुक करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून कवितेच्या जोरावर सामाजिक जाणीव जागृत करण्याचा तसेच नव्या साहित्यिक प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गौतम वाघमारे, निवृत्ती कानवडे महाराज, प्रताप गुंजाळ, नवनाथ सरोदे आणि रवि काशिद यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## केटीसी ट्रकची मोटरसायकलला धडक

### मोटर सायकल स्वार दोन्ही भावंडांचे पाय मोडले; माहूर घाटात मोटर सायकलला धडक देऊन ट्रक पसार







**सुभाष खडसे :** माहूर तालुक्यातील मौजे आष्टा येथून दोन सख्खे भाऊ मोटर सायकलद्वारे माहूर शहरात बाजारासाठी येत असताना मालवाडा घाटातील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर मोटर सायकल स्वार दोन्ही भावंडांना केटीसी लिहिलेल्या मोठ्या ट्रकने धडक देऊन दोघांना गंभीर जखमी करत पसार झाल्याची घटना दि 2 रोजी 12 वाजता घडल्याने जखमींना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्याची घटना घडली आहे

मौजे आष्टा येथून सोमवारी बाजारचा दिवस असल्याने शाईन मोटरसायकल क्रमांक MH 20 B J 9809 वरुन गणेश भाऊसिंग राठोड वय 50 अणि रमेश भाऊसिंग राठोड वय 45 दोघे राहणार कसळसिंग तांडा माहूर कडे येत होते मालवाडा घाटातील अतिशय गंभीर असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालया समोरील घातक वळणावरून दोघे येत असताना माहूर वरून आदिलाबाद कडे जाणाऱ्या केटीसी ट्रक भरधाव वेगात आल्याने मोटरसायकलला त्याचा धक्का बसल्याने दोघेजण अर्धवट असलेल्या रस्त्यावरील गीट्टीवर आढळले त्यामुळे दोघांचे उजवे पाय पोटरी जवळ मोडले व छातीला डोक्याला गंभीर मार लागला उपस्थितांनि त्यांना जवळच असलेल्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले यावेळी केटीसी कंपनीच्या ट्रकच्या स्पीडला ब्रेक लावावा अशी मागणी उपस्थित नागरिकांनी पोलिसांना केली रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ ओमप्रकाश साबळे यांनी प्रथमोपचार करून 108 ॲम्बुलन्स चे चालक आसिफ बेग यांचे देखरेखित यवतमाळ येथे पुढील उपचारासाठी पाठवले

मालवाडा घाटात अर्ध्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून वन विभागाच्या अडचणीमुळे अर्ध्या रस्त्याचे काम एका बाजूने झाले परंतु दुसरी बाजू अर्धवट ठेवल्याने या ठिकाणी रहदारीस प्रचंड अडथळे येत दररोज अपघात घडत आहेत त्यामुळे सदरील रस्त्याचे काम तात्काळ निकाली काढण्याची मागणी वाहनधारकातून होत असून ट्रॉमा केअर सेंटर असते तर येथेच त्यांचा उपचार झाला असता अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थितातून येत होती

## "वाशिम मेरा युवा भारत केंद्राच्या वतीने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

### नेहरू युवा बहुउद्देशीम मंडळ "राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा यांचा पुढाकार




**वाशिम(प्रतिनिधी) :** दि.1 युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार मेरा युवा भारत केंद्र वाशिम व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ केकतउमरा आणि राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था यांच्या सहकार्याने वाशिम तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रम अध्यक्षा श्रीमती वर्षा लाकडे मॅडम जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेम्भूरणे, क्रीडा विभाग विजय बोथडे, नॅशनल खेळाडू सुशांत कळढोणे, मा. राष्ट्रीय युवा स्वयंसेवक माय भारत प्रदिप पट्टेबहादूर, क्रीडा शिक्षक बब्रुवहन वैद्य, अनुप इंगळे, यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये 15 ते 29 गटातील युवक युवती यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. या क्रीडा स्पर्धेमध्ये मुलींकरिता 100 मीटर धावणे, लांब उडी आणि खो.खो स्पर्धा घेण्यात आल्या, तर मुलांकरिता 100 मीटर धावणे, गोळा फेक आणि कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. महिला 100 मीटर धावणे या स्पर्धेमध्ये प्रथम क्र.अर्पणा ठोके, द्वितीय क्र.आरुषी साबळे,तृतीय क्र. सांची उचित, पुरुष 100 मीटर धावणे स्पर्धेमध्ये प्रथम क्र. पवन गावंडे, द्वितीय क्र.विशाल भेंडेकर,तृतीय क्र. रवी शेळके यांनी पटकाविला, गोळा फेक स्पर्धेमध्ये पुरुष गट प्रथम क्र हर्षद मुठाळ, द्वितीय क्र. योगेश खरात, तृतीय क्र. रवी शेळके यांनी पटकाविला

महिला खो-खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक शिवाजी विद्यालय वाशिम, द्वितीय क्र. आदिवासी मुलीचे शासकीय वस्तीगृह वाशिम, तृतीय क्र. मागासवर्गीय त्याचा आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुलीची शासकीय वस्तीगृह सिव्हिलाईन यांनी पटकाविला तर प्रथम क्र. कबड्डी स्पर्धेमध्ये राधे राधे क्रीडा संघ वाशिम, द्वितीय क्र. श्री शिवाजी विद्यालय क्रीडा संघ वाशिम, तृतीय क्र. नवरंग बजरंग क्रीडा मंडळ यांनी पटकाविला. यावेळी विजेत्या सर्व स्पर्धकांना ट्रॉफी सन्मानचिन्ह मेडल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रम हा मेरा युवा भारत केंद्र जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर मॅडम व कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो,माय भारत स्वयंसेविका कु. आकांशा गायकवाड यांनी केले. कामाचे प्रास्ताविक कार्यक्रमाची रूपरेषा नेहरू युवा मंडळ अध्यक्ष प्रदीप पट्टेबहादूर यांनी मांडली. या कार्यक्रमास विशेष सहकार्य राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा प्रविण पट्टेबहादूर, पंच आतिश कांबळे,दत्ता काकडे,निलेश कोरणे, विशेष परिश्रम अतिश टापरे, आकांक्षा गायकवाड, अंजली इंगोले, निकिता पट्टेबहादूर व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांचे लाभले. उपस्थित सर्वांचे आभार आतिश कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवा पिढीमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करून त्यांचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. ग्रामीण व शहरी युवक-युवतींना आपली क्रीडापटू गुणवत्ता दाखविण्यास व्यासपीठ उपलब्ध करून देणे, संघभावना, शिस्त व नेतृत्वगुणांचा विकास घडवून आणणे तसेच खेळाच्या माध्यमातून सकारात्मक जीवनमूल्ये रुजविणे हा या उपक्रमाचा हेतू होता.

## पोमेंडी पश्चिम रांगळेवाडीचा कौटुंबिक स्नेहमेळावा मोठ्या दिमाखात संपन्न




**मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** साहित्य संघ, गिरगांव मुंबई येथे पोमेंडी पश्चिम रांगळेवाडी यांच्या वतीने स्व. गणपत मानक रांगळे यांच्या स्मरणार्थ आयोजित कौटुंबिक स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि दिमाखात पार पडला. सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जतन आणि मुंबईतील सार्वजनिक खोल्या वाचविण्याच्या संघर्षाला बळ देणारा हा स्नेहमेळावा ठरला. वाडीतील बांधव-भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे व अध्यक्ष पंढरीनाथ रांगळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम हाऊसफुल्ल झाला आणि एकजुटीचे प्रभावी दर्शन घडले.

यावेळी कुणबी समाजोन्नती संघ, मुंबईचे सरचिटणीस कृष्णाजी वने गुहागर विधानसभेचे माजी आमदार विनयजी नातू भाजपा उत्तर रत्नागिरी ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष तथा पोमेंडी गावचे सुपुत्र मंगेश रांगळे भाजपा उत्तर रत्नागिरीचे सरचिटणीस निलेशजी सुर्वे माजी रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष प्रशांतजी शिरगावकर कुणबी समाजोन्नती संघ तालुका गुहागर शाखेचे अध्यक्ष अनंत मालप मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. सुभाषजी बाणे तसेच भाजपाचे तालुकास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोमेंडी पश्चिम रांगळेवाडीने हा स्नेहमेळावा केवळ स्नेहबंध दृढ करण्यापुरता मर्यादित नसून, वाडीच्या विविध सामाजिक उपक्रमांना चालना देणे तसेच सार्वजनिक खोलीच्या लढ्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

कार्यक्रमादरम्यान कानसे ग्रुप चिखली यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या कोंकणातील प्रसिद्ध नमन कलेने उपस्थितांची मने जिंकली. त्याचप्रमाणे "दक्खनचा वाघ" या ऐतिहासिक वगनाट्याने कार्यक्रमात रंगत भरली आणि उपस्थितांची मने जिंकली. यावेळी वाडी मंडळाने तयार केलेली चित्रफीत सादर करण्यात आली. या चित्रफितीतून गावच्या विकासकामांचा आढावा प्रभावीपणे मांडण्यात आला या सादरीकरणामुळे उपस्थितांना गावच्या लाल मातीची जिव्हाळ्याची आठवण झाली.मान्यवरांनी आपल्या भाषणातून पूर्वीच्या काळी गावखोलीचे सामाजिक महत्त्व, तसेच आज अनेक ठिकाणी त्या खोलींवर होणाऱ्या अन्यायकारक अतिक्रमणांवर तीव्र चिंता व्यक्त करत, पोमेंडी पश्चिम रांगळेवाडीचा सुरू असलेला लढा निश्चितच यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला आणि शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाने वाडीच्या एकजुटीने सर्व काही साध्य होऊ शकते, हा प्रेरणादायी संदेश सर्वांपर्यंत पोहोचवत सामाजिक बांधिलकी अधिक दृढ केली.

## भगूर येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली



**भगूर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** संत रोहिदास महाराज यांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने भगूर येथील प्रतिष्टीत नागरिक व महिला वर्ग उपस्तिथ होते. रोहिदास जयंती अध्यक्ष जालिंदर सूर्यवंशी, महिला अध्यक्ष शशिकला सूर्यवंशी, नगरसेवक काकासाहेब देशमुख, नगरसेविका जयश्री देशमुख, नगरसेवक अजय वाहने, पत्रकार गोकुळ लोखंडे विक्रम सोनवणे, ॲड. निलेश साळवे,भारती साळवे, बाळू साळवे, दिपक भंडारी, राजेश दाणी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. विक्रम सोनवणे यांनी संत रोहिदास यांच्या जीवनावर आधारित मार्गदर्शन केले व संत रोहिदासांनी जाती धर्म व लिंग भेद याविषयी जो लढा उभारला तसेच मन चंगा तो कटोती मे गंगा या ब्रीदवाक्यप्रमाने त्यांनी समाज सुधारण्याचे काम केले त्यांचे ग्रंथ अभंग आणि रचना शिखांच्या गुरु ग्रंथ साहेब मध्ये समाविष्ट आहेत तसेच ते मीराबाईचे गुरू मानले जातात संत रोहिदास यांचा जन्म वाराणसी उत्तर प्रदेश येथील सिर गोवर्धन पूर या गावात माघ पौर्णिमेला झाला असे आपल्या मनोगतातून विक्रम सोनवणे यांनी व्यक्त केले. जयंती उत्सवात अमर सूर्यवंशी, मोहित सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, तुकाराम सूर्यवंशी, अक्षय सूर्यवंशी, राहुल सूर्यवंशी, चिंतामण सूर्यवंशी,गणेश पठाडे, गोटीराम सूर्यवंशी,अनिल सूर्यवंशी, हिरामण सूर्यवंशी, केशव सूर्यवंशी, शकूबाई सूर्यवंशी, छाया सूर्यवंशी, शांता सूर्यवंशी, लता सूर्यवंशी, सविता सूर्यवंशी, पूनम पठाडे, मधुकर सूर्यवंशी रंजनाबाई सूर्यवंशी हिराबाई सूर्यवंशी समाधान सूर्यवंशी तेजस सूर्यवंशी ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांच्या वतीने जयंती निमित्त उपस्थित होते.

## आंध्रप्रदेशच्या धर्तीवर 'मन्नेरवारलू' वगळून 'कोलावार' दुरुस्ती करा !; ट्रायबल फोरम : राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

TRIBAL FORUM
ट्रायबल फोरम

**राज्यशासनाने ८ वर्षापासून अहवाल दडपल्याचा आरोप**

**राज्यातील आदिवासींचे नुकसान टाळण्यासाठी राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत आंध्रप्रदेशाच्या धर्तीवर दुरुस्ती करुन सुधारणा करण्याची मागणी ट्रायबल फोरम संघटनेने केली आहे.आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेचे तत्कालीन आयुक्त नरेंद्र पोयाम यांनी ऑगस्ट २०१७ मध्ये सविस्तर अहवाल आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना पाठविला आहे.राज्य शासनाने आठ वर्षापासून हा अहवाल दडपून ठेवला आहे."**

**बाळकृष्ण मते राज्य उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम**

**भिवंडी (सुनील झळके) :** आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही 'मन्नेरवारलू' वगळून 'कोलावार' अशी दुरुस्ती करण्याची मागणी राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांचेकडे ट्रायबल फोरमचे राज्य उपाध्यक्ष बाळकृष्ण मते यांनी केली आहे.

मराठवाडा हा प्रदेश स्वातंत्र्यपूर्व काळात निजामाच्या हैदराबाद संस्थानचा भाग होता. निजामशाहीतून हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या लढ्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले.संविधान (अनुसूचित जमाती)आदेश १९५० अन्वये तत्कालीन हैदराबाद राज्यासाठी ( औरंगाबाद विभागातील जिल्ह्यासह) प्रसिद्ध केलेल्या अनुसूचित जमाती यादीत अ.क्र. ६ वर कोलाम, मन्नेरवारलू अशी नोंद आहे. तर मध्यप्रदेश राज्यासाठी (विदर्भातील जिल्ह्यासह)प्रसिद्ध केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अ.क्र.१९ वर कोलाम अशी नोंद होती. त्यानंतर राज्य पुनर्रचना कायदा,१९५६ लागू झाला. त्या अंतर्गत आंध्रप्रदेश राज्यातील औरंगाबाद विभागातील त्यावेळेस अस्तित्वात असलेले एकत्रित जिल्हे छत्रपती संभाजीनगर ,परभणी,नांदेड,उस्मानाबाद , बीड या जिल्हयांचा समावेश होता. दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी हैदराबाद राज्यातील औरंगाबाद महसूल विभागातील पाचही जिल्ह्यातील क्षेत्राचा तत्कालीन मुंबई राज्यात समावेश झाला. त्यामुळे कोलाम,मन्नेरवारलू ही नोंद जशाची तशी महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातीच्या यादीत कायम राहीली.

**'मन्नेरवारलू' जमातीचा उगम आंध्रप्रदेशमधून**

'मन्नेरवारलू' या जमातीचा उगमच मुळात आंध्रप्रदेश मधून झाला आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (सुधारणा) कायदा २००२ प्रमाणे आंध्रप्रदेश राज्यातून 'मन्नेरवारलू' जमात वगळली असून 'मन्नेरवारलू' ऐवजी 'कोलावार' अशी दुरुस्ती करुन सुधारणा केलेली आहे.या दुरुस्तीला २४ वर्षे झाली आहे.

**महाराष्ट्रात अद्याप दुरुस्ती नाही**

आंध्रप्रदेश राज्यात 'मन्नेरवारलू' जमातीच्या नामसदृश्याचा फायदा मोठ्या प्रमाणात घेत असल्यामुळे तेथील राज्यशासनाच्या शिफारशी वरुन केंद्र शासनाने 'मन्नेरवारलू' ही जमात वगळली असून त्याऐवजी 'कोलावार' अशी दुरुस्ती करुन सुधारणा केलेली आहे.महाराष्ट्र राज्यातही मोठ्या प्रमाणात 'मन्नेरवारलू' जमातीच्या नामसदृश्याचा फायदा घेतला जात आहे.परंतू महाराष्ट्रात मात्र 'मन्नेरवारलू' वगळून सुधारणा केलेली नाही.

**राज्यात ११ हजार जातवैधता प्रमाणपत्रे**

राज्यात नोव्हेंबर २०२३ पर्यंत ११ हजार ४५ 'मन्नेरवारलू' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित झाल्यामुळे शासकीय सेवेतील वर्ग १ ते वर्ग ४ च्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागा मोठ्या प्रमाणात बळकावल्या आहेत. याशिवाय दरवर्षी अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या राखीव जागा मोठ्या प्रमाणात बळकावल्या जात आहे.त्यामुळे नोकरी व शैक्षणिक क्षेत्रातील भरुन न निघणारे नुकसान होत आहे.

## देवळाली कॅम्प शिवजन्मोत्सव सोहळा समिती ; अध्यक्षपदी प्रमोद मोजाड;कार्याध्यक्ष किरण बेरड







**देवळाली कॅम्प (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** देवळाली कॅम्प शहर सार्वजनिक शिवजन्मौउत्सव समिती -२०२६ अध्यक्षपदी प्रमोद मोजाड तर कार्याध्यक्ष किरण बेरड यांची सर्वांनुमते एकमताने निवड करण्यात आली. मावळते समितीचे माजी अध्यक्ष सतिष कासार यांच्या अध्यक्षते खाली शिवजन्मौउत्सव समिती बैठकीचे आयोजन देवळाली कॅम्प सिंधी पंचायत सभागृहात बैठक आयोजित करण्यांत आली होती. यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्ड मा उपाध्यक्ष दिनकर पाळदे यांनी प्रमोद मोजाड यांच्या नावाची सुचना केली यावेळी उपस्थित सर्व सभासदांनी प्रमोद मोजाड यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब केले यावेळी जेष्ठ सभासद पोपटराव जाधव, बाळासाहेब गोडसे, खंडेराव मेढे गोकुळ मोजाड, संदीप चौधरी, किरण मोजाड, चंद्रकांत गोडसे, संदीप शिंदे, साहेबराव चौधरी, सुरेश कदम, ज्ञानेश्वर गावंडे, रतन पाळदे, विलास गिते, छबुनाना निसाळ, राहुल गिते,राहुल मोजाड,किरण धोंगडे,अमित गावंडे,मच्छिंद्र पाळदे,सिध्देश मेढे,विलास संगमनेरे, बंटी चौधरी ,आदींसह सभासद आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद मोजाड यांनी सांगितले सर्व सामान्यांसाठी उपयुक्त सामाजिक उपक्रम राबवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारानुसार जयंती साजरी करण्यात येणार येऊन सर्वांना सोबत घेऊन शिवजन्मौउत्सव मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा करणार असल्याचे सांगून टाकलेल्या विश्वासात बद्दल आभार व्यक्त केले. नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला .सुत्रसंचलन खंडेराव मेढे तर आभार गोकुळ मोजाड यांनी मानले

# ऐसा दादा पुन्हा होणे नाही..!

## पोखरभोशीवासीयांची करुण आर्त हाक

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातदरम्यान दुःखद निधन झाले.हा संपूर्ण महाराष्ट्रावर झालेला मोठा आघात होता.अशावेळी आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी सर्व कार्यकर्त्ये आणि समाज प्रत्यक्ष बारामती येथे पोचू शकला नाही,त्यामुळे मौजे पोखरभोशी ता. लोहा जि.नांदेड येथील समाजबांधवांनी दिनांक:०१ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज प्रांगणात आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष तथा विद्यमान उपसरपंच फुलाजी नारायणराव पाटील ताटे,अंकुश शिवाजी ताटे, प्रकाश दत्ता ताटे, शत्रुघ्न बालाजी डांगे, मुरलीधर डांगे, खुशाल ताटे, हनमंत ताटे, संग्राम ताटे,किशन डांगे, नरेंद्र डिगंबर ताटे, भगवान बालाजी डांगे ,आप्पाराव डांगे,भागवत ताटे, पंडित ताटे यांनी आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण केली. यावेळी अजितदादांचे पोखरभोशी गावात आलेल्या आठवणींना उजाळा देण्यात आला.अशा आपल्या लाडक्या नेत्याला गावकऱ्यांनी जड अंतःकरणाने आदरांजली वाहिली.

# राष्ट्रीय स्तरावरील मोटीवेशनल स्पीकर, एज्युकेशनल advisor सदाशिव पांचाळ यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल विशेष सन्मान

महाराष्ट्र जीत

**तळेरे (प्रतिनिधी-गुरुनाथतिरपणकर) :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे (तालुका कणकवली) येथील राष्ट्रीय स्तरावरील मोटीवेशनल स्पीकर, एज्युकेशनल advisor सदाशिव बाळकृष्ण पांचाळ यांच्या गेल्या 20 वर्षाच्या काळात केलेल्या शैक्षणिक योगदानाबद्दल तळेरे येथील आदर्श व्यापारी संघटनेच्या 69 व्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या आदर्श व्यापारी संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष प्रसाद पारकर, डॉ. मिलिंद कुलकर्णी, उपसरपंच संदीप घाडी, माजी सभापती दिलीप तळेकर, अमोल सोरप आदी मान्यवर उपस्थित होते. जगप्रसिध्द एज्युकेशनल ॲडव्हायजर सदाशिव बाळकृष्ण पांचाळ यांना अलीकडेच पुणे येथील फाउंडेशन फॉर एज्युकेशन अँड कम्युनिटी वेल्फेअर यांच्याकडून देण्यात येणारा राज्यस्तरीय ज्ञानदीप उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार 2026 देऊन पुणे येथील विशेष कार्यक्रमात गौरविण्यात आले. सदाशिव पांचाळ हे २००३ पासून शिक्षक नसतानाही शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. गोवा, कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, अमरावती, सातारा, कोल्हापूर अशा अनेक जिल्ह्यांत जाऊन विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले आहे.



**परदेशातही अनेक विद्यार्थी**

लॉकडाऊन नंतर ऑनलाईन पध्दतीने दुबई, मलेशिया, सिंगापूर, दोहा, कतार, अबुधाबी, नेदरलँड, साऊदी अरेबीया, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंग्लंड अशा विविध देशांतील विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन केले आहे. आजही असंख्य विद्यार्थी आणि पालक पांचाळ सरांचे मार्गदर्शन घेतात.

आपण समाजाचे देणे लागतो, या भावनेतून सदाशिव पांचाळ यांनी "पाढ्यांची कार्यशाळा" या उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत एक लाख पेक्षा अधिक मुलांना विनामूल्य मार्गदर्शन करत जगाच्या कानाकोपऱ्यात नावलौकीक मिळवले आहे. त्यांचा "बुध्दिबळ" हा मुलांच्या बौध्दिक क्षमता विकसित करणारा कार्यक्रम आज खुप चालतो आहे. यात विद्यार्थी आणि पालक यांचा समावेश तर असतोच, पण या कार्यक्रमाचे कौतुक अनेक डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनिअर तसेच अमेरिकेत विविध विषयांचे पेटंट असलेले वैज्ञानिक अतुल नाईक यांनीही केले आहे. सदाशिव पांचाळ यांना यापुर्वीही विविध संस्थांनी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविले आहे.

# चितळे बंधु येथे घरफोडी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार जेरबंद आंबेगाव पोलीस स्टेशनची कौतुकास्पद कामगिरी; एकुण तिन गुन्हे उघडकिस

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** दिनांक २५/०१/२०२६ रोजी रात्री २२/१५ वा ते दि.२६/०१/२०२६ रोजी सकाळी ०७/४५ वा. चे सुमारास विंडसर काऊंटी सोसायटी, दत्तनगर नन्हे रोड आंबेगांव पुणे येथील वेद फुड चितळे बंधु गाळा नं.१४ व १५ चे शटर उचकटुन चोरी केल्याबाबत आंबेगाव पोलीस ठाणे गु.रजि क्रमांक ३१/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(४), ३३१(३), ३२४(२) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयांत आंबेगाव पोलीस ठाण्याचे तपास पथकाने कसोशीने प्रयत्न करुन घटनास्थळाचे परीसरातील सी.सी.टि.व्ही फुटेजच्या व गोपनीय माहितीचे आधारे आरोपी नामे १) ओमकार मारुती देडे यय-२१ वर्षे काम साफसफाई रा. गणपती मंदिरासमोर, किरकटवाडी, धायरी पुणे २) विधीसंघर्षीत बालक यांना आंबेगाव




पोलीस स्टेशन तपास पथकातील पोउपनिरी मोहन कळमकर व अंमलदार यांनी सापळा रचुन पकडले. सदरचा गुन्हा त्यांनी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी यांचेकडुन एकुण तिन गुन्हे उघडकिस आले आहेत.

१) आंबेगाव पोलीस ठाणे गु.रजि क्रमांक ३१/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(४), ३३१(३), ३२४(२) प्रमाणे.

२) आंबेगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक ३४/२०२६ बी.एन.एस. ३०२ (२) प्रमाणे

३) विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक ३८५/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे.

सदर आरोपीकडुन एकुण ०१,२४,६००/- रुपये किंमतीचे ऑटो रिक्षा, मोटारसायकल व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास आंबेगाव पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोउनि मोहन कळमकर हे करत आहेत. सदर आरोपीची आजपावेतो पोलीस कस्टडी मंजुर आहे.

सदरची कारवाई मा.श्री. अमितेश कुमार पोलीस आयुक्त सारे पुणे शहर, मा.श्री. रंजन कुमार शर्मा पोलीस सह आयुक्त पुणे शहर, मा. श्री. राजेश बनसोडे अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे, मा. श्री. मिलींद मोहिते पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ पुणे शहर व मा. श्री. राहुल आवारे सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने आंबेगाव पोलीस स्टेशन यांचे सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) गजानन चोरमले, पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर तसेच पोलीस अंमलदार शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हणमंत मासाळ, निलेश जमदाडे, प्रमोद भोसले, सुभाष मोरे, योगेश जगदाळे, हरिश गायकवाड, राकेश टेकवडे, शिवाजी पोटोळे यांच्या पथकाने केली.

# डॉ. गुजर सुभाष हायस्कुलमध्ये उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** डॉ. गुजर सुभाष हायस्कुलमध्ये शोकसभा आयोजित करण्यात आली. याप्रसंगी प्रतिमा पुजनानंतर शोकसभेसाठी जेष्ठ पत्रकार सुधाकर गोडसे उपस्थित होते. यावेळी गोडसे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील अनुभवी, अभ्यासू आणि जनतेशी नाळ जपणारे नेतृत्व, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला यावेळी संस्थेचे अध्यक्ष तीरथ वासवानी, उपाध्यक्ष अनिल ग्यानचंदानी, कार्याध्यक्ष नवीन गुरनानी, उपकार्याध्यक्ष मुलचंद अहुजा , सहसचिव चंद्रकांत वेंसियानी, विनोद





चावला, सुंदरसिंघ नरसिंघाणी, घनश्याम केवलाणी, सचिन चाफेकर, तेजपाल चावला, प्रकाश लखवानी, डॉ. विजय चावला, हिरो रिझवाणी, सुनील बालानी,रवी मेवाणी, सुदेश आमेसर, राजेश मंगतानी,मुख्याध्यापक डॉ. बन्सीलाल गाडीलोहार, शितल मेहेरोलिया, सिमरन चावला यांसह विद्यार्थी, पालक, सर्व शिक्षक – शिक्षकेतर कर्मचा-यांनी श्रद्धांजली वाहिली.

# महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटना परभणी विभाग कार्यकारणी 2026 जाहीर

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** विभागिय अध्यक्ष पदी. श्री. मदनराव भालेराव यांची निवड तर विभागिय सचिवपदी. श्री. गोविंदजी वैद्य यांची निवड करण्यात आली आज दि01 फेब्रुवारी 2026 रोजी महाराष्ट्र एस टी कामगार संघटना परभणी विभागाची कार्यकारणी संपन्न झाली. यामध्ये विभागाची शान, कामगार संघटनेचे ढाण्या वाघ. सर्व एस. टी. कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शक लाडके नेतृत्व मा. श्री. गोविंदरावजी वैद्य साहेब यांची सर्वानुमते बिनविरोध विभागीय सचिव पदी निवड झाली. तर निवडणूक स्वरूपात मा. श्री. मदनराव भालेराव साहेब यांची विभागीय अध्यक्ष पदी निवड झाली. नवनिर्वाचित दोन्ही विभागीय नेतृत्वाचे व नूतन



कार्यकारणीला परभणी. आणि हिंगोली आगारातुन शुभेच्छांचा वर्षाव होतं असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरावरून कौतुक करण्यात येत आहे.

श्री.मदनराव भालेराव यांनी एस. टी. कर्मचाऱ्यांच्या .सर्व अडचणी व समस्या सोडवायला तत्पर हजर राहून सर्वांचे समाधान होईल असे आश्वासन देऊन. आभार मानण्यात आले.

# पातुर येथे जन्म मृत्यू विवाह प्रशिक्षण शिबिर संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण/ सारकिन्ही :** जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने जन्म मृत्यू विवाह पोर्टलवर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पातुर येथे आयोजित करण्यात आले होते. जिल्हा आरोग्य अधिकारी, तथा जिल्हा निबंधक डॉ. बळीराम गाढवे, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पातुर येथे यांच्या मार्गदर्शनामध्ये पातुर तालुक्यातील सर्व ग्राम विकास अधिकारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहायिका, आरोग्य सहाय्यक प्राथमिक आरोग्य केंद्रातील डाटा एन्ट्री ऑपरेटर, यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन इंगळे ,प्रशिक्षक कु.अंकिता गावंडे सांख्यिकी अधिकारी, श्री वसीम शेख सांख्यिकी पर्यवेक्षक, कुमारी पल्लवी भुईभार डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते. तालुक्यातील लाभार्थ्यांना वेळेत जन्माचे दाखले मिळण्याकरिता सी. आर. एस पोर्टलवर एन्ट्री करण्याबाबतची सखोल माहिती प्रोजेक्टर द्वारे देण्यात आली तसेच जन्म मृत्यू नोंदणी मध्ये विलंब झाल्यास नियमानुसार करवायची प्रक्रिया बाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. टी बी मुक्त ग्रामपंचायत बाबत नितीन थुटे यांनी मार्गदर्शन केले तसेच कुष्ठरोग विषयी शपथविधी संपन्न करण्यात आली तसेच प्रशिक्षणास व शपथविधीला पंचायत समिती पातुर कार्यालयाकडून आरोग्य विस्तार अधिकारी श्रीमती सुनंदाताई कासार, कांबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गजानन इंगळे, पातुर वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश लोखंडे, डॉ. साक्षी चव्हाण, डॉ. खंडाळे मॅडम, सर्व आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, तालुका आरोग्य कार्यालयातील मनोहर घुगे, जुबेर उपस्थित होते.

# संत रविदासांनी समतेचा विचार समाजाच्या केंद्रस्थानी ठेवला - श्रीकांत माने

महाराष्ट्र जीत

**कारंजा (तालुका प्रतिनिधी) :** संत रविदास महाराजांनी कर्मकांडाला ठाम विरोध करत समतेचा विचार समाजाच्या केंद्रस्थानी ठेवला.जात,धर्म आणि वर्णभेद न मानता माणुसकी व समता हाच खरा धर्म असल्याचा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला,असे प्रतिपादन कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांनी केले.राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेच्या वतीने १ फेब्रुवारी रोजी कारंजा येथील महालक्ष्मी मंगलम येथे आयोजित संत रविदास महाराज जयंती व चर्मकार समाज मेळाव्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी मधुकरराव सोनटक्के,सेवानिवृत्त शिक्षक प्रल्हादराव पानझाडे,जीवन प्राधिकरणचे सेवानिवृत्त कर्मचारी गणेशराव भटकर,भडशिवणी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.वर्षाताई अंबाळकर,सदाशिवराव राजगुरे धामणी (खडी), गजाननराव शेगोकार,बेंबळा,पांडुरंग चिमणकर बेलखेड (कामठा),भारतीय रेल्वेचे सेवानिवृत्त सीनियर सेक्शन इंजिनियर शंकरराव पानझाडे कामरगाव,अरुणराव वानरे शिरसोली,दिगंबरराव ठाकरे निंभा जहागीर पिंपळगाव खुर्द ग्रामपंचायतचे माजी सदस्य नथ्थू शेगोकार, मानोरा येथील गजानन घुबडे हे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संत रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

माने पुढे म्हणाले की, संत रविदास महाराजांनी सामाजिक विषमता, अंधश्रद्धा आणि रूढ परंपरांविरोधात आवाज उठवला. त्यांच्या विचारांमुळे दुर्बल व वंचित घटकांना आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा मिळाली. आजच्या काळातही त्यांचे विचार समाजासाठी मार्गदर्शक असून समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी ते आत्मसात करणे गरजेचे आहे. चर्मकार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले .समाजाने शिक्षणाला प्राधान्य द्यावे असे आवाहन माने यांनी यावेळी केले दरम्यान दहावी ,बारावी,पदवी व पदव्युत्तर आणि इतर परीक्षा व स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थी चैतन्य अशोक घुडे ,तुलसी श्रीराम पानझाडे,धनश्री मधुकर सोनटक्के,सानिका शशांक सोनटक्के,श्रावणी योगेश भटकर, नक्षत्रा महादेव पिंगळे, अक्षता वसंत इंगळे,



आयुष नारायण काटकर,वैष्णवी संतोष गव्हाळे व आर्यन गजानन ताकतोडे या गुणवंतांना उपस्थित अतिथींच्या हस्ते पुष्पगुच्छ,शील्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.तत्पूर्वी प्रमिला अंबाळकर अनुसया माने,रिद्धी दायदार नंदिनी वानखडे, अनुश्री माने यांनी स्वागत गीत म्हटले.दरम्यान शासन सेवेत बढती मिळाल्याबद्दल सौ.रेखा मधुकरराव सोनटक्के, पांडुरंग गव्हाळे आणि सौ.लक्ष्मी खुशाल राजगुरे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तर सेवानिवृत्तीबद्दल विलास दायदार यांचाही यावेळी शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी अनुश्री माने हिने केलेले भाषण लक्षवेधी ठरले.दरम्यान अतिथिपैकी मधुकरराव सोनटक्के,प्रल्हादराव पानझाडे, गजाननराव घुबडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून त्याद्वारे चर्मकार समाजाने चुकीच्या चालीरीती व परंपरा यापासून अलिप्त राहून मुलांना शिक्षणाचे प्रवाहात आणावे आणि आपली प्रगती साधावी असे आवाहन केले. प्रास्तविक आतिश मालखेडे यांनी केले. संचालन पांडुरंग गव्हाळे यांनी केले तर ज्ञानेश्वर घुडे यांनी आभार मानले.या कार्यक्रमाला चर्मकार समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या कारंजा तालुका शाखेचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.